# नळेगाव : ग्रामीण भागातील रस्त्यावरील वाढते अपघात चिंताजनक, उपाययोजनाची गरज

**नळेगाव/अजगर मचकुरी :** नळेगावसह परीसरात रस्ते अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून ग्रामीण रस्त्यावर चालू वर्षात अपघाताची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सर्वत्र बेफिकीर वेग, नियमांचा भंग, नशेत वाहन चालविणे चिंताजनक आहे. वाहतुकीचे योग्य नियोजन नसल्याने ग्रामीण मार्गावरही अपघाताच्या घटना घडत आहेत. हेल्मेट, सीटबेल्ट न वापरणे आणि ओव्हरटेक करताना घाई करणे ही अपघातांची प्रमुख कारणे असल्याचे अपघाताच्या घटनावरुन दिसते.



वाढते अपघात लक्षात घेता, वाहतूक नियंत्रण आणि रस्ते सुरक्षा यासाठी बहुआयामी उपाययोजना तातडीने अमलात आणण्याची गरज आहे. धोकादायक चौकांवर सिग्नल, रिफ्लेक्टर, चेतावणी फलक आणि स्पीड ब्रेकर बसवणे आवश्यक आहे. मात्र अनेक रस्त्यांवर उपाययोजनाच दिसत नसल्याचे चित्र आहे.

ग्रामीण भागांना जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था आणि सुसाट धावणारी वाहने यामुळे अपघाताच्या वाढत्या घटना चिंताजनक आहेत. ग्रामीण भागातील वळणदार रस्त्यांवर प्रकाशव्यवस्था देखील नसते.रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडझुडपे वाढली आहेत.

महामार्गावर रस्ते चांगली झाली आहेत. यामुळे वहानाच्या वेग वाढला असून दुचाकीस्वार नियम पाळत नसल्याचे चित्र पहावयास मिळते. रस्ता ओलांडताना जास्त प्रमाणात अपघात घडत आहेत.

**रस्ते अपघातात तरुणांचे प्रमाण अधिक**

अपघातांमध्ये तरुणांचे प्रमाण सर्वाधिक असून, अनेक कुटुंबांची उद्ध्वस्त होत असलेली परिस्थिती गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण करत आहे. त्यामुळे वाढते अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना आणि कडक नियमाचे पालन होणे आवश्यक आहे.

**सायंकाळची वेळ घातक**

रस्त्यावरील वाढते अपघात चिंतेची बाब आहे. रात्री वहान चालवताना समोरील वाहनांच्या लाईट मुळे दुचाकीस्वाराला काही दिसत नाही. संध्याकाळी रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या संख्येने असते. याच दरम्यान अपघाताचे प्रमाण अधिक असल्याचे झालेल्या अपघाताच्या घटनावरुन दिसून येते.

वाहतुकीच्या नियमांनुसार, गाडी चालवताना नेहमी लेन शिस्त पाळा, वेग मर्यादा ओलांडू नका, सिग्नल आणि वाहतूक चिन्हांना पालन करा आणि मद्यपान करून किंवा मोबाईलवर बोलत गाडी चालवू नका. नियम तोडल्यास मोठा दंड आणि तुरुंगवासासारखी शिक्षा होऊ शकते.

**महत्त्वाचे नियम**

लेन शिस्त

वेग मर्यादा

वाहतूक चिन्हे आणि सिग्नल

**सुरक्षितता:**

वाहन चालवताना मोबाईल फोन वापरू नका.

मद्यपान करून वाहन चालवू नका.

अनावश्यक ठिकाणी किंवा धोकादायक स्थितीत वाहन उभे करू नका.

वाहनाच्या बाहेर बसून प्रवास करू नका.

## १९ वर्षांपासून फरार असलेला व फसवणुक करणारा, विशेष पथकाच्या कारवाईत जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर पोलिसांच्या विशेष पथकाने डारमंड फाईलमधील महत्त्वाच्या फसवणुकीच्या गुन्ह्यातील १९ वर्षे फरार असलेल्या आरोपीला अखेर मुसक्या आवळण्यात यश मिळवले आहे. हा आरोपी २००६ पासून पोलीस प्रशासन व न्यायालयास सतत गुंगारा देत असल्याने त्याचा शोध लागणे हे पोलीस दलासाठी मोठे आव्हान ठरले होते.




पोलीस स्टेशन गांधी चौक, गु.र.नं. १४०/२००६ कायदा : कलम ४२०, ४६८, ४७१ भादवि आरसीसी नं. ७३०/२००६ डीएफ नं. १३०/२०१८ मधील अभंग प्रभु उर्फ प्रभाकर वय : ५३ वर्षे रा. बोबळी (बु.), ता. देवणी, जि. लातूर याची विरुद्ध दि. १४/०६/२००६ रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता.त्यानंतर तो पळून जाऊन सतत ठिकाण बदलत राहिल्याने तो सापडत नव्हता. तो गावोगाव फिरत राहून स्वतः ला ग्रामपंचायत टाकळीचा सरपंच असल्याचे भासवून, बोगस जन्म दाखले तयार करून नागरिकांची फसवणूक करीत होता.मी ग्रामपंचायत टाकळीचा सरपंच आहे असे सांगून मुलांचे कोरे जन्मदाखले भरून, स्वतःचे बनावट स्वाक्षरी- शिक्के मारून बनावट दाखले दिले.

हे दाखले शाळेत दिल्यावर शिक्षकांनी संशय घेतला. आरोपीला विचारणा केल्यावर तो सरपंच नसल्याचे उघड झाले त्याने २९ मुलांचे बोगस जन्मदाखले तयार करून प्रत्येकी ४० ते ५० रुपये घेतले होते. हे दाखले शाळांमध्ये पहिलीमध्ये प्रवेशासाठी वापरण्यात आले. त्या वेळी तपासिक पोउपनि सी.एम. गोरे यांनी सरपंच कार्यालयाचे शिक्के, हस्ताक्षर नमुने, बोगस फॉर्म आदी मुद्देमाल पंचनाम्यात जप्त केला होता.

विशेष पथकास बोबळी (बु.) ता. देवणी भागात राहत असल्याची गुप्त माहिती मिळाली. मा. अपर पोलीस अधीक्षक लातूर यांना कळवून त्वरित पथकाने छापा टाकला. कारवाईमध्ये सदरील व्यक्तीस घरी २३/११/२०२५ रोजी ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन गांधी चौक येथे हजर करण्यात आले.आरोपीस मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्यासमक्ष हजर केल्यावर न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकातील सपोनि शिवशंकर मनाळे, पोउपनि संजय भोसले, दत्तात्रय शिंदे, श्रीकांत कुंभार यांनी केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## लग्नसराईमुळे भाजीपाल्याचे दर गगनाला, बाजारात आवक कमी झाल्याचा परिणाम

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील भाजी बाजारात सध्या पालेभाज्यांचे दर वाढल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. लग्नसराई व विविध कार्यक्रमाने व अतिवृष्टीचा फटका बसल्याने बाजारातील भाजीची आवक कमी झाली आहे. यामुळे सध्या पालेभाज्यांसह भाज्यांचे दर वाढले आहेत. जुडीत १० ते १५ रुपयांपर्यंत मिळणारी मेथी-शेपू ५० ते ६० रुपयांपर्यंत मिळते आहे. याशिवाय गवार १६० तर वांगे- भेंडी १०० रुपये किलो दराने मिळत आहे. या दरवाढीचा शेतकरी वर्गाला फायदा होत असून गृहिणीचे मात्र महिन्याचे बजेट कोलमडत आहे. पुढील काही दिवस दरात अशीच परिस्थिती पाहायला मिळणार असल्याचे भाजी विक्रेते यांनी सांगितले आहे.

## राष्ट्रीय महामार्ग ३६१ झाला जोखीम महामार्ग; अंधार, कोंडी अन् दुर्लक्षामुळे प्रवासी, वाहनचालक हैराण

**औसा/प्रतिनिधी :** रत्नागिरीनागपूर या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर औसा तुळजापूर दरम्यान प्रवास करणे दिवसेंदिवस धोकादायक ठरत आहे. सुमारे ५३ किलोमीटरच्या या मार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निष्काळजीपणामुळे नागरिक आणि वाहनचालकांना चिखल, अंधार आणि वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. दररोज हजारो वाहने या महामार्गावरून धावतात, मात्र सुविधांचा बोजवारा उडाल्याने या मार्गाला जोखीम महामार्ग असे नावच पडले आहे.

महामार्गाच्या कडेला पावसामुळे व रस्त्याच्या देखभालीअभावी मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. काही ठिकाणी तर हा चिखल रस्त्यावर आल्याने वाहनांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्राधिकरणाच्या दुर्लक्षामुळे रस्त्याची दुरवस्था वाढत चालली असून कोणताही तातडीचा उपाय केला जात नाही. याशिवाय, अनेक गावांमधील उड्डाणपुलांच्या खालून जाणाऱ्या मार्गांमध्ये कायमच अंधार पसरलेला असतो. वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने हे बोगदे काळोखात बुडालेले असतात. परिणामी रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना भीतीचे वातावरण निर्माण होते.

प्रकाशयोजनेअभावी अनेक वेळा वाहनांची टक्कर होण्याचे प्रसंग घडतात. स्थानिक नागरिकांच्या मते, प्राधिकरणाकडून दिवे दुरुस्त करण्याची कोणतीही नियमित देखभाल केली जात नाही. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांकडून टोल आकारला जातो, परंतु त्याबदल्यात मूलभूत सुविधा मिळत नाहीत, ही वाहनचालकांची सर्वात मोठी तक्रार आहे. महामार्गालगत असलेल्या अनेक बसस्थानकांची अवस्था अत्यंत दयनीय असून, घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. प्रवाशांना



बसण्यासाठी स्वच्छ जागा नाही, पावसाळ्यात पाणी साचते, आणि डास-माशांचा त्रास वाढतो. याशिवाय, उड्डाणपुलावरील दिवे वारंवार बंद पडतात. त्यामुळे पुलावरही अंधार असतो. रात्रीच्या वेळी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच मार्गावर असलेल्या सीएनजी पंपांवरही परिस्थिती बिकट आहे. वाहनचालकांच्या लांबच लांब रांगा थेट महामार्गावरलागतात. त्यामुळे वाहतुकीत अडथळा निर्माण होतो आणि वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढते.

## रासायनिक खतांच्या किमती वाढल्या

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला. रब्बीच्या पेरण्या दुबार कराव्या लागल्या, महागामोलाची खते व बियाणे वाया गेली. त्यात आता रासायनिक खतांच्या किमती २०० ते २५० रुपये प्रति बॅग वाढल्यामुळे शेतकऱ्यांसमोर नव्यानेच आर्थिक संकट उभे राहिले आहे. गेल्या वर्षभरात ज्वारीसह इतर सर्वच धान्यांचा भाव स्थीर राहिल्यामुळे व पेरणीला उशीर झाल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. त्यात आता खतांच्या किमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांना शेती करावी की नाही असा प्रश्न पडला आहे.

रेणापूर तालुक्यात अतिवृतीमुळे सोयाबीनसह खरीपाची पीके वाया गेली. रेणा व मांजरा नदी काठच्या शेकडो शेतकऱ्यांना त्याचा जबर फटका बसला अनेकांचे सोयाबीन नदीच्या पुरात वाहून गेले. आजही कांही शेतकऱ्यांच्या शेतातील पाणी साचुन आहे. वेळेवर रब्बीची पेरणी करावी म्हणुन कांहीं शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या, तर काहींच्या वापसा नसल्यामुळे होऊ शकल्या नाहीत.

ज्यांनी ज्यांनी पेरण्या केल्या होत्या त्यांना दुबार पेरणी करावी लागली. दर वर्षी कोणत्या ना कोणत्या नैसर्गीक आपत्तीला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे खर्च अधिक व उत्पादन कमी अशी स्थिती निर्माण होत आहे. कर्जाचा बोजा वाढत चालल्याने शेतकरी अधिकच कर्जबाजारी होत आहे.

नदीकाठच्या बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याने खरडुन गेल्या आहेत. त्यांना रब्बीची पेरणी करणे शक्य नाही. खरीपही गेले आणि रब्बीही गेली अशी अवस्था झाली आहे. अगोदरच खते, बियाणे व किटक नाशक औषधांच्या किमती वाढल्या असतांनाच आता परत एकदा खतांच्या एका गोणीमागे २०० ते २५० रुपयांने खतांच्या किंमती वाढल्या आहेत.

दुबार - तिबार पेरणीचे संकट उभे असतांनाच खतांच्या किमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत लोकप्रतिधिना शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास सध्या तरी वेळ नाही. एकीकडे खते, बीयाणे व औषधांच्या किमती भरमसाठ वाढत आहेत. तर दुसरीकडे शेतमालाचे भाव कमी अधिक होत आहेत. शासनाने कांही धान्यांचा हमी भाव जाहीर केला परंतु बाजारात तसा भाव मिळत नाही.

दर वर्षी खरीप व रब्बी हंगामात मिश्र व रासायनिक खतांना मोठी मागणी असते, दरवर्षी खतांची मागणी वाढतच आहे. हि बाब लक्षात घेऊन खत कंपन्यांनी खतांच्या किमती भरमसाठ वाढविल्या आहेत. ९:२४:२४ - १९०० वरून २१०० तर पोटॅश १८०० वरून २००० रुपये प्रति बॅगप्रमाणे आहेत. केंद्र सरकारने १ नोहेंबरपासून खतांच्या किमती २०० ते २५० रुपयांनी वाढविल्या आहेत.

## नाराजांनो ..

नेहमीकशी नाराजी
बालहट्ट आता मोडा
घेतचं राहतो सारखे
विचार करावा थोडा

जमता नवीसोयरिक
बरोबर घाली खोडा
तगड्या नव-यासाठी
दामटा म्हातारा घोडा

हवे अढळसत्तास्थान
कधी तरी नाद सोडा
माझ्याचं अंगणी पडो
कायम प्राजक्ती सडा

आधी बसे जेवायला
कधीतरी पंगती वाढा
केलानाही त्यागकधी
आपल्या ताटा ओढा

गल्ली दिल्ली कुठेही
रे मीचं राहणारं खडा
परआनंद पाहवत ना
टाकला मीठाचाखडा

कर्तव्यजाणा बापाचे
ते कधीतरी पारपाडा
चेहरानीत हिरमुसला
गरीब बिचारा बापडा

मधु मेह ग्रासला जरी
तरीही मागतात पेढा
जुनाट कर्तृत्वगोष्टींचा
वाचत राहतात पाढा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का, ११ उमेदवारांची ऐनवेळी निवडणुकीतून माघार?

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील रेणापूर नगरपंचायतीच्या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे गट) ला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे नगराध्यक्षपदासह एकूण १६ पैकी तब्बल ११ उमेदवार ऐन निवडणुकीच्या ऐन भरातून माघार घेऊन तटस्थ राहिले आहेत. पक्षाकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्याची भावना या उमेदवारांनी व्यक्त केली आहे. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी पूर्ण ताकदीने निवडणूक लढवण्याचे आदेश दिले होते, मात्र पक्षांतर्गत अडथळ्यांमुळे हा निर्णय घेण्याची वेळ आल्याचे माघार घेतलेल्या उमेदवारांचे म्हणणे आहे.

२०१६ मध्ये स्थापन झालेल्या रेणापूर नगरपंचायतीच्या २०१७ च्या पहिल्या निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवली होती. आताच्या निवडणुकीत भाजप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट असे चौरंगी लढतीचे चित्र होते. मात्र, ठाकरे गटाच्या ११ उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणुकीत आता वेगळीच रंगत आली आहे. या निर्णयामुळे रेणापूरच्या राजकारणात मोठे वादळ उठले असून, या माघारीचा फायदा कोणाला होणार आणि कोणाला तोटा होणार, याचे गणित आता लावले जात आहे. राजकीय वर्तुळात



अशी चर्चा आहे की, लातूर ग्रामीणचे माजी आमदार आणि काँग्रेस नेत्यांनी भाजपला आव्हान देण्यासाठी शिवसेनेला कमकुवत केले आहे. विरोधकांचा आरोप आहे की, शिवसेनेच्या ११ उमेदवारांना स्थानिक पातळीवर आपल्या बाजूने वळवून माघार घ्यायला लावणे ही एक खेळी आहे.समजलेल्या माहितीनुसार माघार घेतलेल्या उमेदवारांमध्ये नगराध्यक्षपदाच्या उमेदवार ललिता बंजारा यांचा समावेश आहे. तसेच प्रभाग क्रमांक ३ मधून अनुसया कोल्हे, प्रभाग ५ मधून महेश व्यवहारे, प्रभाग ६ मधून गोविंद सुरवसे, प्रभाग ८ मधून रेखा शिंदे, प्रभाग १० मधून रेहानबी कुरेशी, प्रभाग ११ मधून छाया आकनगीरे, प्रभाग १२ मधून राजन हाके, प्रभाग १३ मधून धोंडीराम चव्हाण, प्रभाग १४ मधून शांताबाई चव्हाण आणि प्रभाग १७ मधून बाबाराव ठावरे यांनी माघार घेतली आहे.

शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सर्व उमेदवारांना पूर्ण ताकदीने निवडणूक लढवण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पक्षांतर्गत काही अडथळे येत असल्यामुळे हा निर्णय घेण्याची वेळ आल्याचे माघार घेतलेल्या उमेदवारांनी सांगितले.

रेणापूर नगरपंचायतीची स्थापना २०१६ मध्ये झाली होती. २०१७ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवून सत्ता स्थापन केली होती. त्यानंतर तीन वर्षे नगरपंचायतीवर प्रशासकाचा कारभार चालला. आता पुन्हा एकदा निवडणूक होत आहे. या निवडणुकीत भाजप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट असे अनेक पक्ष मैदानात उतरले आहेत. त्यामुळे ही निवडणूक चौरंगी लढतीची होणार असे वाटत होते.

मात्र, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या ११ उमेदवारांनी ऐन निवडणुकीच्या ऐन भरातून माघार घेतल्याने आता या निवडणुकीत वेगळीच रंगत आली आहे. या माघारीमुळे रेणापूरच्या राजकारणात मोठे वादळ उठण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे कोणाला फायदा होणार आणि कोणाला तोटा होणार, याचे गणित आता राजकीय विश्लेषक घालत आहेत.

राजकीय वर्तुळात अशीही चर्चा आहे की, लातूर ग्रामीणचे माजी आमदार आणि काँग्रेसचे नेते धीरज देशमुख यांनी भाजपला शह देण्यासाठी शिवसेनेला कमकुवत केले आहे. विरोधकांचा असा आरोप आहे की, काँग्रेसनेच शिवसेनेच्या ११ उमेदवारांना स्थानिक पातळीवर आपल्या बाजूने वळवून माघार घ्यायला लावली आहे. ही काँग्रेसचीच खेळी असल्याचे बोलले जात आहे. या सर्व घडामोडींमुळे रेणापूर नगरपंचायतीच्या निवडणुकीचे चित्र आता पूर्णपणे बदलले आहे.

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६